# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 24/06/2020 (बुधवार)
(सकाळ)

## घरफोडी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 1 कि.मी. चिचपुरा सावनेर येथे दिनांक 20/06/2020 चे 17:00 वा. ते दिनांक 23/06/2020 चे 07:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुखदेव किसन ढोके, वय 51 वर्ष, रा. चिचपुरा सावनेर व त्यांचे परीवाराचे लोक घरी हजर नसतांना त्यांचे घराचे किचन रूमला असलेले कुलुप अज्ञात आरोपीने आत मधुन तोडून घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने घरातील कपाटामध्ये ठेवलेल सोन्याचे दागिने कि. 4,000/–रू. व नगदी कि. 8,000/–रू. असा एकुण कि. 12,000/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ यादव 8888821393 हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 01 कि. मी अंतरावर मौजा आठवडी बाजार कोंढाळी येथे दिनांक 23/06/2020 चे 12:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– संदीप राधेश्याम बावनकसे, वय 20 वर्ष, रा. शनिचरापेठ कोंढाळी यांच्या भावाचा आठवडी बाजारात वादविवाद सुरू असता फिर्यादी हे भांडण सोडविण्याकरिता मध्यस्थी गेले असता आरोपी नामे– 1) सोनु व 2) शेख गफार शेख सत्तार, वय 50 वर्ष, दोन्ही रा. शनिचरापेठ कोंढाळी यांनी संगनमत करून फिर्यादी सोबत भांडण केले. तसेच आरोपीतांनी फिर्यादीस शिविगाळ करून प्लॉस्टिकच्या कॅरेटने डोक्याचे मागील बाजूस मारहाण करून जखमी केले व मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक दारसिंग राठोड 9860427902 हे करीत आहे.

# अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 3 कि.मी. अंतरावरील एनएच 7 उमरेड बायपास पुलाजवळ येथे दिनांक 23/06/2020 चे 02:15 वा. ते 02:45 वा. दरम्यान आरोपी नामे– जोगासिंग अमरसिंग धुम्मन, वय 42 वर्ष, रा. नांदेड याने एमएच– 26/ एच– 7914 क्रमांकाचा ट्रक मध्ये 8 लोकांना बसवुन त्याच्या ताब्यातील भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन उमरेड बायपास जवळील नाल्याचे पुलावरील कठडयाला जोराची धडक दिली. या अपघातात वाहन पुलाखाली पडून ट्रक मधील 1) रामनरेश राततिपाल सोनी, वय 31 वर्ष, रा. ओलीकला रिवा रायपुर म.प्र., 2) राजेश त्र्यंबक वाकोडे, वय 40 वर्ष, रा. नागपुर यांचे जागीच मृत्यू झाले. तर इतर 6 लोकांचे गंभीर जखमी होण्यास आरोपी कारणीभुत ठरला. जखमींचे उपचार मेडीकल कॉलेज नागपूर येथे सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सागर हनुमान नेवारे, वय 24 वर्ष, रा. कुपण रोडगे यांचे घरी किरायाने रूक्मीणी टाउन वार्ड कं 02 बुटीबोरी, ता.जि.नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी जखमी असल्याने अटक नाही. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. अमोल लगड 9834176423 हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 2 कि.मी. अंतरावरील रामटेक ते तुमसर रोड सुर्या हॉटेल जवळ रामटेक येथे दिनांक 23/03/2020 चे 16:30 वा. ते 16:45 वा. दरम्यान आरोपी नामे– संग्राम सिंग प्रभाकरराव याने त्याच्या ताब्यातील एमएच– 31/एफए–1730 क्रमाकाचा सिमेंट मिक्सर ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोर जाणारे एमएच–31/एफ –केके 1730 क्रमांकाच्या मेस्ट्रो मोपेडला धडक दिली. या अपघातात मोपेड स्वार ज्योती कांबळे या जखमी झाल्या तर सोबती मंगला कैलास बरवे, वय 47 वर्ष, रा. रामटेक यांचा जागीच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अभिषेक कैलास बर्वे, वय 25 वर्ष, रा. गांधी वार्ड रामटेक यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. शेंडगे 9011253003 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर